**प्रेसनोट दि. १०.१०.२०२२**

लोकसेवक श्रीमती मनिषा मोहनराव कुलकर्णी, गावकामगार तलाठी खेराडे वांगी, ता. कडेगाव जि. सांगली यांनी १५,०००/- रूपये लाच मागणी करून लाच स्विकारले बाबत सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांचे वडीलांची शासनाने पुनर्वसन साठी जमीन संपादित करतेवेळी चुकलेली ७/१२ वरील आणेवारी दुरूस्त करून देण्याकरीता श्रीमती कुलकर्णी, गावकामगार तलाठी कार्यालय, खेराडे वांगी, ता. कडेगाव, जि. सांगली यांनी तक्रारदार यांचेकडे २०,०००/- रूपये लाच मागणी करीत असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि.३०.०९.२०२२ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो सांगली कार्यालयात दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक ०७.१०.२०२२ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये तक्रारदार यांचे वडीलांचे शासनाने पुनर्वसन साठी जमीन संपादित करतेवेळी चुकलेली ७/१२ वरील आणेवारी दुरूस्त करून देण्याकरीता श्रीमती कुलकर्णी, गावकामगार तलाठी, खेराडे वांगी, ता. कडेगाव यांनी तक्रारदार यांचेकडे २०,०००/- रूपये लाचेची मागणी करून चर्चेअंती १५०००/- रूपये लाच मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आज दि.१०.१०.२०२२ रोजी गावकामगार तलाठी कार्यालय, खेराडे वांगी, ता. कडेगाव या ठिकाणी सापळा लावला असता श्रीमती मनिषा मोहनराव कुलकर्णी वय ३७ वर्ष गावकामगार तलाठी कार्यालय, खेराडे वांगी, ता. कडेगाव जि. सांगली रा. ब्राह्मणपुरी, इस्लामपुर ता. वाळवा जि. सांगली यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून १५०००/- रूपये लाच रक्कम गावकामगार तलाठी कार्यालय, खेराडे वांगी ता. कडेगाव मध्ये स्विकारली असता त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने श्रीमती मनिषा मोहनराव कुलकर्णी वय ३७ वर्ष गावकामगार तलाठी कार्यालय, खेराडे वांगी, ता. कडेगाव जि. सांगली रा. ब्राह्मणपुरी, इस्लामपुर ता. वाळवा जि. सांगली यांचे विरुध्द कडेगाव पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्री. सुरज गुरव, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे पोलीस उप अधीक्षक, श्री. दत्तात्रय पुजारी पोलीस निरीक्षक, पोलीस अंमलदार अविनाश सागर, सलिम मकानदार,सिमा माने, संजय संकपाळ, प्रितम चौगुले, चालक स्वप्नील भोसले यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स अॅप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल अॅप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

पोलीस उप अधीक्षक * लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सांगली *

(सुजय घाटगे)
पोलीस उप अधीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली.

Scanned with OKEN Scanner